| | | |
|---|---|---|
| | **P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**<br>**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**<br>**Premlok Park Chinchwad,**<br>**Maharashtra - 411033** | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

**<u>प्रेसनोट</u>** दिनांक -२४/०९/२०२२

**पिंपरी चिंचवड पोलीस दलातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेसाठी घेण्यात आलेल्या 'गोकी फिटनेस चॅलेंज' स्पर्धेतील विजेत्यांचा मा. श्री. अंकुश शिंदे पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांचे हस्ते बक्षिस वितरण समारंभ कार्यक्रम संपन्न झाले बाबत.**

आज दिनांक २४.०९.२०२२ रोजी पिंपरी चिंचवड पोलीस दलातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरीता गोकी स्मार्ट बॅन्ड या कंपनीच्या वतीने घेण्यात आलेल्या गोकी फिटनेस चॅलेंज स्पर्धेतील सर्व विजेत्यांचा मा. श्री. अंकुश शिंदे पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांचे हस्ते बक्षिस वितरण समारंभ कार्यक्रम पोलीस मुख्यालय, निगडी येथे आयोजित करण्यात आला होता.

पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरीता गोकी फिटनेस चॅलेंज स्पर्धा ही दिनांक २६ फेब्रुवारी २०२२ ते २७ एप्रिल २०२२ या कालावधीमध्ये घेण्यात आली होती यामध्ये १,००० कि.मी. सायकल चालविणे आणि ३०० कि.मी. धावणे असे या स्पर्धेचे स्वरुप ठरविण्यात आलेले होते. या स्पर्धेमध्ये पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय अंतर्गत एकुण २,१९४ पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सहभाग घेतला होता. सहभागी स्पर्धकांपैकी एकूण ९४ पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सदरची स्पर्धा ही यशस्वी रित्या पुर्ण केलेली असून यामध्ये ४४ पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी १,००० कि.मी. सायकल चालवून स्पर्धा पुर्ण केलेली आहे व ५० पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी ३०० कि.मी धावून स्पर्धा पुर्ण करून विजयी झालेले असल्याने सर्व विजेत्यांना मा. पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे यांचे हस्ते स्मार्ट गिअर सायकल बक्षिस स्वरुपात वाटप करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमात बोलताना मा. श्री. अंकुश शिंदे पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी माजी पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश यांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातुन राबविलेल्या उपक्रमाचे कौतुक करून गोकी स्मार्ट बॅन्ड या कंपनीने स्पर्धा आयोजित केल्याने त्यांच्या सर्व टीमचे आभार मानले तसेच पोलीस अधिकारी व अमंलदार हे फ्रंट वॉरिअरच्या भुमिकेत असून अहोरात्र समाजाच्या सुरक्षितता व लोकांच्या सेवेसाठी आपले कर्तव्य बजावत आहेत. त्याकरिता आपले स्वास्थ्याकडे अधिक लक्ष देवून आपले कर्तव्य बजवावे. शारीरिक व मानसिक निरोगी राहायचे असेल तर शरिराला व्यायाम गरजेचा आहे. असे मोलाचे मार्गदर्शन करून स्पर्धापुर्ण केलेल्या सर्व स्पर्धक विजेत्यांना शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेतील विजेते स्पर्धक श्री. सागर कवडे (सहायक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग), श्री. राकेश गुमाने (सहायक पोलीस निरीक्षक), श्रीमती. स्वाती लामखेडे (महिला पोलीस उप-निरीक्षक), श्रीमती. सुरेखा देशमुख (महिला पोलीस हवालदार), व पोलीस अंमलदार विनायक विधाते यांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरिता अशी स्पर्धा राबवुन सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल पोलीस आयुक्तालयाचे आभार मानत स्पर्धेतील आपला अनुभव व्यक्त केला.

सदर कार्यक्रमास मा. श्री. अंकुश शिंदे पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, यांचेसह श्री. सागर कवडे सहायक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग, श्री. रावसाहेब जाधव वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क अधिकारी तसेच गोकी फिटनेस चॅलेंज स्पर्धेचे एकूण ९४ विजेते पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते

**(रावसाहेब जाधव )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा,
जनसंपर्क अधिकारी पिंपरी चिंचवड